एस.सी.आर. सुप्रीम कोर्ट रिपोर्ट्स ४५१

चंद्रमलाई इस्टेटचे व्यवस्थापन, एर्नाकुलम

वि.

त्यांचे कामगार आणि इतर

मा. जस्टिस पी. बी. गजेंद्रगडकर, के. एन. वांचू आणि के. सी. गुप्ता

औद्योगिक वाद - तडजोडीचे अपयश - संप पुकारण्यापूर्वी योग्य आणि वाजवी मार्ग युनियनने स्वीकारावा.

कामगारांनी मांडलेल्या काही मागण्या मान्य करण्यास व्यवस्थापनाने नकार दिल्याने हे प्रकरण तडजोडीसाठी पाठविण्यात आले. ३० नोव्हेंबर १९५५ रोजी तडजोडीचे प्रयत्न अयशस्वी ठरले. दुसऱ्याच दिवशी संघटनेने संप-नोटीस दिली आणि प्रत्यक्षात ९ डिसेंबर १९५८ पासून संपावर गेले. ३ जानेवारी १९५६ रोजी सरकारने हा वाद औद्योगिक न्यायाधिकरणाकडे पाठवला आणि ५ जानेवारी १९५६ रोजी संप मागे घेण्यात आला. कामगारांना संपाच्या कालावधीचे वेतन मिळण्याचा अधिकार आहे का, असा प्रश्न लवादाकडे पाठविण्यात आलेल्या

काही प्रश्नांमध्ये होता. लवादाने संपासाठी दोन्ही पक्ष जबाबदार असून कामगारांना संपाच्या कालावधीतील ५० टक्के मानधन मिळण्याचा हक्क असल्याचे मत नोंदवले.

न्यायनिर्णय: खटल्याच्या वस्तुस्थितीनुसार संप अवाजवी असून कामगारांना या कालावधीसाठी कोणत्याही मजुरीचा अधिकार नाही, असे मत व्यक्त केले.

जेव्हा सामंजस्याचे प्रयत्न अयशस्वी झाले तेव्हा संघटनेने संप करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी औद्योगिक लवादाकडे संदर्भ पाठवण्यास सांगून वाद मिटविण्यासाठी कायद्याने दिलेला सामान्य आणि वाजवी मार्ग अवलंबणे रास्त होते. कामगारांच्या हातातील वैध शस्त्र असलेला संप सामान्यत: उद्दिष्टाच्या शांततापूर्ण प्राप्तीसाठी वाजवी मार्ग न सोडता घाईघाईने अवलंब केल्यास, न्याय्य ठरणार नाही.

सिविल अपील अधिकार क्षेत्र : दिवाणी अपील क्रमांक 347/1959.

१९५६ च्या औद्योगिक वाद क्रमांक ६३ प्रमाणे औद्योगिक न्यायाधिकरण क्र. १, एर्नाकुलम यांच्या १७ ऑक्टोबर १९५७ च्या निर्णयातून विशेष परवानगीने अपील.

अपीलकर्त्यातर्फे एस. गोविंद स्वामिनाधन आणि पी. राम रेड्डी.

प्रतिवादी क्रमांक १ साठी जेकब ए. चक्रमलकल आणि के. सुंदरराजन.

प्रतिवादी क्रमांक २ साठी के. आर. चौधरी.

१९६०, ४ एप्रिल

मा. जस्टिस दास गुप्ता यांच्याद्वारे न्यायालयाचा निर्णय देण्यात आला -

९ ऑगस्ट १९५५ रोजी चंद्रमलाई इस्टेटमधील कामगारांच्या संघटनेने इस्टेटच्या व्यवस्थापकांना एक निवेदन सादर केले. जरी व्यवस्थापनाने काही मागण्या केल्या तरी काही मागण्यांची पूर्तता झाली नाही. २९ ऑगस्ट १९५५ रोजी लेबर ऑफिसर, त्रिचूर ज्यांना इस्टेटचे व्यवस्थापन तसेच लेबर युनियन या दोघांनीही या प्रकरणाची माहिती दिली होती, त्यांनी याची दखल घेत व्यवस्थापनचे प्रतिनिधी आणि कामगार यांच्यात परस्पर वाटाघाटी करण्याचा सल्ला दिला. शेवटी हे प्रकरण लेबर ऑफसरने त्रिचूर येथील तडजोड अधिकारी यांच्याकडे तडजोडीकरीता सुचवले. परंतु, तडजोडअधिकाऱ्याचे प्रयत्न व्यर्थ ठरले. शेवटची तडजोडीची बैठक ३०, १९५५ रोजी झाल्याचे दिसून येते. दुसऱ्याच दिवशी युनियनने संपाची अधिसूचना दिली आणि कामगार ९ डिसेंबर ते १९५५ पासून संपावर गेले. ५ जानेवारी १९५६ रोजी संप बंद झाला. तत्पूर्वी ५ जानेवारी रोजी केंद्र सरकारने पाच मागण्यांसंदर्भातील वाद त्रिवेंद्रम येथील औद्योगिक न्यायाधिकरणाकडे न्यायदानासाठी पाठविला होता. त्यानंतर १ जून १९५६ च्या आदेशाद्वारे हा वाद त्रिवेंद्रम लवादातून मागे घेण्यात आला आणि एर्नाकुलम येथील औद्योगिक न्यायाधिकरणाकडे पाठविण्यात आला. लवादाने १७ ऑक्टोबर १९५७ रोजी दिलेल्या निर्णयाद्वारे सर्व मुद्द्यांवर कामगारांच्या मागण्या मान्य केल्या. त्या पैकी तीन मुद्द्यांवर लवादाने दिलेल्या निर्णयाविरोधात

चंद्रमलई इस्टेटच्या व्यवस्थापनाने सध्याचे अपील दाखल केले आहे. हे तीन मुद्दे रेफरन्समध्ये अशा प्रकारे सांगितले आहेत –

"१. नियंत्रणमुक्तीनंतर कामगारांना विकल्या गेलेल्या तांदळाची किंमत व्यवस्थापनाने जास्त वसूल केली होती का? आणि तसे असेल तर कामगारांना अशा प्रकारे गोळा केलेल्या जादा किमतीचा परतावा मिळण्याचा अधिकार आहे का ?

२. ज्या तारखेपासून कांबळी भत्ता बंद करण्यात आला त्या तारखेपासून पूर्वलक्षी प्रभावाने भत्ता मिळण्याचा अधिकार आहे का आणि अशा भत्त्याचा दर किती असावा ?

३. कामगारांना संपाच्या कालावधीचे वेतन मिळण्याचा हक्क आहे का ? "

पहिल्या मुद्द्यावर कामगारांचे म्हणणे असे होते की, एप्रिल १९५४ मध्ये त्रावणकोर कोचीन सरकारने तांदळावरील नियंत्रण उठविल्यानंतर व्यवस्थापनाने कामगारांना जे तांदूळ विकले, त्या तांदूळासाठी प्रति १ १/२ जास्तीच्या मोजमापाकरिता १२ आणे जादा दराने किंमत आकारली जात होती. कामगारांच्या मते हे अयोग्य आणि अन्यायकारक आहे आणि त्यांनी व्यवस्थापनाला केलेल्या जादा रकमेचा परतावा देण्याचा दावा केला. व्यवस्थापनेचे असे म्हणणे होते कि इस्टेटच्या व्यवस्थापनाकडून तांदूळ घेण्यास कामगार बांधील नव्हते आणि दुसरे म्हणजे केवळ प्रत्यक्ष किंमतच घेतलेली आहे आणि कोणतेही जादा शुल्क आकारले गेलेले नाही. लवादाने

त्यावर निर्णय दिला कि व्यवस्थापनाने किमतीपेक्षा जास्त शुल्क आकारले आहे आणि जास्तीचे घेतलेले शुल्क कामगारांना परत करावे.

दुसरा मुद्दा कांबळी भत्त्याच्या दाव्यासंदर्भात होता. चंद्रमलाई टी इस्टेट उंचावर आहे. या भागातील इस्टेटमध्ये कामगारांना ब्लँकेट देऊन त्यांचे थंडीपासून संरक्षण करावे यासाठी ब्लँकेट देण्याची प्रथा होती, आणि हा नोकरीच्या अटींचा एक भाग होता यात वाद नाही. परंतु असे असूनही या इस्टेटच्या व्यवस्थापनाने १९४९ पासून भत्ता देणे बंद केले आणि १९५४ मध्येच देयक पुन्हा सुरू केले. ९ ऑगस्ट १९५५ पर्यंत याविषयी कोणताही वाद उपस्थित झाला नाही, तो या उशीरा पर्यंत उपस्थित करण्याचे कारण नाही, असा व्यवस्थापनाचा बचाव होता. लवादाने हा युक्तिवाद फेटाळून लावला आणि १९४९, १९५० आणि १९५१ या वर्षांसाठी प्रतिवर्ष ७ रुपये आणि १९५२ व १९५३ या वर्षांसाठी प्रतिवर्ष ९ रुपये असे एकूण ३९ रुपये एकत्रित भत्ता दिला.

तिसऱ्या मुद्द्यावर कामगारांनी संप रास्त असल्याचा युक्तिवाद केला, तर व्यवस्थापनाने हा संप बेकायदेशीर व अन्यायकारक असल्याचा युक्तिवाद केला. लवादाने संपासाठी दोन्ही पक्ष जबाबदार असल्याचे सांगत कामगारांना संपाच्या कालावधीसाठी त्यांच्या एकूण वेतनाच्या ५० टक्के वेतन देण्याचे आदेश दिले.

तांदळाची जादा किंमत गोळा झाल्याच्या प्रश्नावर अपीलकर्त्याचा आमच्यासमोरचा युक्तिवाद केवळ या प्रश्नापुरता मर्यादित आहे की, न्यायाधिकरणाचा, योग्य किमतीपेक्षा जास्त

किंमत वसूल झाली, हा निष्कर्ष योग्य होता का? लवादाने, व्यवस्थापनाच्याच नोंदींच्या आधारावर वसूल केलेल्या किमतीसंदर्भात आपला निष्कर्ष काढला आहे. व्यवस्थापनाने कागदपत्रांत तांदळाची किंमत एप्रिल, जुलै आणि ऑगस्ट आणि सप्टेंबर या महिन्यांत दाखवली तर मे आणि जूनसाठी या कागदपत्रांत माहिती देण्यात आली नाही. या दोन महिन्यांत लवादाने कामगारांचा साक्षीदार क्रमांक ६ वरून सिद्ध झालेल्या तांदळाचा बाजारभाव हा इस्टेटच्या व्यवस्थापनाने तांदळाची खरेदी केलेली किंमत असल्याचे ठरविले. वस्तुस्थितीच्या या निष्कर्षांमध्ये ढवळाढवळ करावी असे आम्हाला वाटत नाही. किंबहुना लवादाने ज्या कागदपत्रांच्या आधारे आपले निष्कर्ष काढले आहेत, ते पेपर-बुकचा भागही नव्हते, त्यामुळे या प्रश्नाचा आम्ही स्वत: विचार करू इच्छित असलो तरी तसे करणे आमच्यासाठी अशक्य आहे. त्यामुळे तांदळाची व्यवस्थापनाला मिळणारी किंमत आणि व्यवस्थापनाने कामगारांकडून प्रत्यक्षात वसूल केलेली किंमत यासंदर्भात लवादाने दिलेला निष्कर्ष योग्य असण्याबद्दल आम्ही समाधानी आहोत. कामगारांकडून केवळ तांदळाची किंमत आकारण्यात आली, ही व्यवस्थापनाची बाजू लवादाने योग्यरीत्या फेटाळून लावली आहे. कामगारांना व्यवस्थापनाकडून तांदूळ विकत घेण्याची सक्ती केली गेली नाही, ही वस्तुस्थिती फारशी भौतिक नाही; व्यवस्थापनाने कामगारांच्या मदतीसाठी दुकान उघडले होते आणि जादा दर आकारल्याचे निदर्शनास आल्याने निष्पक्षपणे कामगारांना प्रतिपूर्ती करणे आवश्यक आहे. न्यायाधिकरणाला सापडलेल्या आकडेवारीच्या आधारे गोळा केलेली जादा रक्कम परत करण्याच्या या निर्णयाला यशस्वीपणे आव्हान देता येणार नाही.

कांबळी भत्त्याच्या प्रश्नावर ही  मागणी खूप उशीरा केली गेली हा एकमेव बचाव आहे. १९४९ मध्ये तो बंद होईपर्यंत अनेक वर्षे तो नियमितपणे दिला जात होता, ही कबुली कामगारांची बाजू सिद्ध करण्यासाठी पुरेशी आहे की कांबळी भत्ता देणे हा त्यांच्या सेवेच्या अटींचा एक भाग बनला होता. ९ ऑगस्ट १९५५ पर्यंत ही सेवेची अट लागू करण्यास व्यवस्थापनाने नकार दिल्याबद्दल कामगारांनी कोणताही वाद उपस्थित केला नाही, हे त्यांना असा भत्ता नाकारण्याचे पुरेसे कारण ठरेल, असे आम्हाला वाटत नाही.  १९४९ ते १९५४ या कालावधीत हे भत्ते देणे बंद करून व्यवस्थापनाने मनमानी व बेकायदा कारभार केला होता. आता केवळ बरीच वर्षे उलटून गेली आहेत म्हणून सदर भत्ता भरण्यास सांगू नये हे त्यांचे म्हणणे आता ऐकून घेता येणार नाही. उलटपक्षी व्यवस्थापनाने कांबळी भत्ता दिला नाही तरीही कामगारांना स्वत:साठी स्वतःच्या खर्चाने ब्लँकेट घ्यावी लागली होती हा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे लवादाने कामगारांना १९४९ ते १९५३ या कालावधीतील कांबळी भत्ता देण्याचे निर्देश योग्य आहेत. हे दर योग्य आहेत कि नाहीत यास आमच्यासमोर आव्हानीत केलेले नाही. त्यामुळे या विषयावरील लवादाचा निर्णयही कायम ठेवण्यात आला आहे.

आता संपाच्या कालावधीसाठी कामगारांना ५० टक्के मानधन देणे योग्य होते का असा प्रश्न आमच्यापुढे आहे. ३० नोव्हेंबर १९५५ रोजी सामंजस्याचे प्रयत्न अयशस्वी ठरल्याचे युनियनला ठाऊक होते, हे स्पष्ट आहे. पुढची पायरी म्हणजे अशा अपयशाचा अहवाल कन्सिलिएशन ऑफसरने सरकारला देणे  आणि सरकारला संबोधित करणे आणि त्याच वेळी

युनियनने सरकारला औद्योगिक न्यायाधिकरणाकडे सदर संदर्भ पाठवण्याची विनंती करणे हे योग्य आणि रास्त ठरले असते. युनियनने मात्र थांबणे पसंत केले नाही आणि १ डिसेंबर १९५५ रोजी व्यवस्थापनाला नोटीस दिल्यानंतर संप करण्याचा निर्णय घेतला आणि ९ डिसेंबर १९५५ पासून प्रत्यक्षात संप सुरू झाला. अर्जदाराच्या वतीने असे आवाहन करण्यात आले आहे की, असे घाईगडबडीने संप करण्यासारखे त्यांच्या मागण्यांमध्ये काहीही नव्हते आणि कारवाईचे औचित्य सिद्ध करण्याच्या मागणीसाठी आणि निष्पक्षपणे संघटनेने संप करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी सरकारला औद्योगिक विवाद कायद्यांतर्गत रेफरन्स पाठवण्यास सांगून कायद्याने दिलेला सामान्य आणि वाजवी मार्ग अवलंबायला हवा होता. युनियनच्या प्रमुख मागण्या तांदळाचा भाव आणि कांबळी भत्ता याबाबत होत्या. १९४९ पासून ९ ऑगस्ट १९५५ पर्यंत हा भत्ता बंद केल्याबाबत ते काहीच बोलले नव्हते. तांदळाच्या जादा किमतीच्या वसुलीची तक्रार अलीकडची होती, पण तरीही ती इतकी तातडीची नव्हती की, न्यायाधिकरणांच्या माध्यमातून अशा प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी कायद्याने ठरवून दिलेल्या पद्धतीचा अवलंब केला असता तर कामगारांच्या हिताचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले असते. शेवटी संपामुळे उत्पादन थांबले तर त्याचा फटका केवळ मालकालाच बसत नाही. हेही लक्षात ठेवणे तितकेच महत्वाचे आहे कि संप हे एक कामगारांच्या हातातील कधी कधी अपरिहार्य शस्त्र आहे पण या शस्त्राचा अंदाधुंद आणि घाईघाईने वापर व्हायला प्रोत्साहन दिले जाऊ नये. कोणत्याही प्रकारच्या मागणीसाठी संप करू शकतो, असा कामगारांचा विचार योग्य ठरणार नाही. अशी काही प्रकरणे असू शकतात जिथे

मागणी इतकी तातडीची आणि गंभीर स्वरूपाची असते की सरकारने संदर्भ देण्यास सांगितल्यानंतर कामगारांनी प्रतीक्षा करावी अशी अपेक्षा करणे योग्य ठरणार नाही. अशा वेळी रेफ्रन्सची मागणी करण्यापूर्वीच संप करणे योग्य ठरू शकते. सध्याचे प्रकरण मात्र असे नाही. आमच्या मते संप सुरू करण्यापूर्वी सामंजस्याचे प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर कामगारांनी काही काळ वाट पाहायला हवी होती आणि दरम्यानच्या काळात सरकारला रेफरन्स पाठवण्यास सांगायला पाहिजे होते. त्यांनी अजिबात वाट पाहिली नाही. ३० नोव्हेंबर १९५५ रोजी सामंजस्याचे प्रयत्न अयशस्वी ठरले आणि दुसऱ्याच दिवशी युनियनने संपाचा निर्णय घेऊन १ डिसेंबर १९५५ ला नियोजित संपाची नोटीस पाठवली आणि ९ डिसेंबर १९५५ पासून कामगारांनी प्रत्यक्ष कामबंद आंदोलन केले. सरकारने तत्परतेने कार्यवाही करून ३ जानेवारी १९५६ रोजी रेफरन्स पाठवला असे दिसते आहे. त्यानंतरच संप रद्द झाला. अशा परिस्थितीत संप कसा काय योग्य ठरवता येईल, हे आम्ही पाहू शकत नाही.

या प्रश्नावर न्यायाधिकरणाचे दुमत असल्याचे दिसून येते. त्यांचा निष्कर्ष असा दिसतो की संप पूर्णपणे न्याय्य नसला तरी अर्धा न्याय्य आणि अर्धा अन्यायकारक होता; अर्धऔचित्याच्या या जिज्ञासू संकल्पनेचे कौतुक करणे आम्हाला अयोग्य वाटते. तसेही सध्याच्या खटल्याची परिस्थिती संप योग्य होता या निष्कर्षाला समर्थन देत नाही. वर नमूद केलेली परिक्रमेची भूमिका लक्षात घेता लवादाने संप किमान अंशतः रास्त असल्याचे ठरवून चूक केली, असे म्हणण्यास आम्ही बांधील आहोत. ही चूक इतकी गंभीर आहे की, आम्ही हा निर्णय रद्द

करण्यास न्यायाच्या हितासाठी बांधील आहोत. आमच्या मते संप अवाजवी होता आणि त्यामुळे कामगारांना संपाच्या कालावधीसाठी कोणतेही वेतन मिळत नाही, या निष्कर्षापासून सुटका नाही.

त्यामुळे आम्ही अपील अंशत: मान्य करतो आणि संप कालावधीतील एकूण वेतनापैकी ५० % भरण्याचे आदेश रद्द करतो, परंतु उर्वरित आदेश कायम ठेवत आहोत. खर्चाचा आदेश नाही.

अपील मंजूर.

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x